**Pimpri Chinchwad Police Commissionerate**

**प्रेसनोट** दि .०२ .०३ .२०२१

**खुनाचा प्रयत्न व खंडणी सारखा गंभीर गुन्हा दाखल असलेला पाहिजे आरोपीस पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाकडील गुन्हे शाखा युनिट ०२ च्या पथकाने केले जेरबंद**

दिनांक ०१/०३/२०२१ रोजी रात्रौ २३/०० वा. गुन्हे शाखा युनिट ०२ पिंपरी-चिंचवड कढील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांचे पथक पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयातील टॉप २५, तडीपार, पाहिजे / फरारी यांचा शोध घेत निगडी पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना, पोलीस हवालदार ८३२ जयवंत राऊत यांना त्यांच्या बातमीव्दारा मार्फत माहिती मिळाली की, आकुर्डी रेल्वे स्टेशन येथे तळेगाव दाभाडे पोलीस स्टेशन येथे दाखल गुन्हा रजि. नं. ३४९/२०२० भा.द.वि. कलम ३०७,३८४,५०४,५०६, ३४ आर्म ॲक्ट ४ (२५) प्रमाणे दाखल गुन्हयातील पाहिजे आरोपी नामे – कुणाल ऊर्फ बाबा धिरज ठाकुर वय २० वर्षे रा. ५३७ रविवार पेठ, ब्राम्हण आळी, तळेगाव दाभाडे. हा तेथे येणार असल्याची बातमी मिळाल्याने गुन्हे शाखा युनिट ०२ कडील पोलीस हवा. २५३ दिपक खरात, पोलीस हवा. ४४३ प्रमोद वेताळ, पोलीस हवा. ८३२ जयवंत राऊत, पोलीस नाईक १०२३ जमीर तांबोळी यांच्या पथकाने सापळा रचुन त्यास ताब्यात घेवुन त्याच्याकडे चौकशी करुन तळेगाव दाभाडे पोलीस स्टेशनशी संपर्क साधुन त्यांच्या कडुन अधिक माहिती घेतली असता तो सदर गुन्हयात पाहिजे आरोपी असल्याचे निष्पन्न झाल्याने त्याची वैद्यकीय तपासणी करुन रिपोर्टसह पुढिल कारवाईकामी तळेगाव दाभाडे पोलीस स्टेशन येथे हजर करण्यात आले आहे.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त श्री कृष्ण प्रकाश, अप्पर पोलीस आयुक्त श्री रामनाथ पोकळे, पोलीस उप आयुक्त गुन्हे श्री सुधीर हिरेमठ, सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे श्री प्रशांत अमृतकर यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट २ चे पोलीस निरीक्षक शैलेश गायकवाड, पोलीस उप निरीक्षक संजय निलपत्रेवार, पोलीस अंमलदार जयवंत राऊत, दिपक खरात, प्रमोद वेताळ, जमीर तांबोळी, शिवानंद स्वामी, केराप्पा माने, वसंत खोमणे, महिला पोलीस अंमलदार उषा दळे, पोलीस अंमलदार अजित सानप, नामदेव कापसे, आतिष कुडके, शिवाजी मुंढे यांचे पथकाने केली आहे.

(श्री सुधीर हिरेमठ) **भापोसे**
पोलीस उप-आयुक्त गुन्हे
पिंपरी - चिंचवड



पिंपरी-चिंचवड पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय